**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.०५)**

**सोमवार दिनांक ०१ जून २०२६**

**ठळक बातम्या**

1. **विधान परिषद निवडणुकीत विजयी होण्याचा महायुतीला विश्वास तर अनुकूल निकालाची महाविकास आघाडीला अपेक्षा.**
2. **राज्यसभेच्या २४ जागांसाठी होणाऱ्या द्वैवार्षिक निवडणुकीसाठी अधिसूचना जारी; १८ जूनला मतदान.**
3. **ई-बसेससाठी चार्जिंग स्टेशनचे जाळे उभारण्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे निर्देश.**
4. **ज्येष्ठ पार्श्वगायिका सुमन कल्याणपूर यांच्या पार्थिवावर मुंबईत शासकीय इतमामात अंत्यसंस्कार.**

**-------------------------------------------------**

विधान परिषद अर्ज

विधान परिषदेच्या १७ जागांसाठी होणाऱ्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा आज शेवटचा दिवस होता. मतदान आणि मतमोजणी २२ जून ला होणार आहे. भाजपा तर्फे वर्धा, चंद्रपूर आणि गडचिरोली या मतदार संघासाठी अरुण लाखानि, भंडारा आणि गोंदियासाठी अविनाश ब्राह्मणकर, अमरावतीसाठी प्रवीण पोटे पाटील यांना उमेदवारी देण्यात आली आहे.

**-------------------------------------------------**

यवतमाळ उमेदवारी अर्ज

यवतमाळ विधान परिषद निवडणुकीसाठी महायुतीमध्ये कुरघोडीचे राजकारण सुरू झाले असून शिवसेना, भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार या तिन्ही पक्षाच्या उमेदवारांनी आपले नामांकन अर्ज दाखल केले आहेत .महायुतीत ही जागा शिवसेनेला सुटली असल्याचा दावा पालकमंत्री संजय राठोड यांनी केला आणि अखेरच्या क्षणी माजी आमदार दुष्यंत चतुर्वेदी यांच्या नावावर शिक्कामोर्तब झाल्याचं सांगितल. चतुर्वेदी यांचा उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर भाजपतर्फे नितीन भुतडा यांनी मोठ्या संख्येने नगरसेवकांची शक्ती दाखवीत नामांकन दाखल केल. तर राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाचे साजिद बेग यांनीही उमेदवारी दाखल करीत

महायुतीत बिघाडी असल्याचे संकेत दिले. मित्र पक्षांच्या वरिष्ठ नेतृत्वाशी चर्चा करून गैरसमज दूर केले जातील आणि दुष्यंत चतुर्वेदी बहुमताने विजयी होतील असा विश्वास पालकमंत्री संजय राठोड यांनी व्यक्त केला. दुसरीकडे महाविकास आघाडी कडून काँग्रेसचे साहेबराव कांबळे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. तर भंडारा-गोंदिया विधानपरिषद निवडणुकीसाठी काँग्रेसचे प्रफुल अग्रवाल आणि दिलीप बनसोड यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला.

---------------------------------------------------

काँग्रेस उमेदवारी

दरम्यान, महाराष्ट्र विधान परिषदेच्या स्थानिक प्राधिकारी मतदार संघाच्या नागपूर येथील जागेसाठी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे प्रवक्ते अतुल लोंढे आणि माजी जिल्हा परिषद सदस्य दिनेश ढोले यांना महाविकास आघाडीने उमेदवारी जाहीर केली आहे. ही लढाई विचारांची असून लोकप्रतिनिधींना जनतेच्या प्रश्नांना सामोरे जावे लागणार असल्याने सत्ताधारी पक्षाच्या मनमानी विरुद्ध काँग्रेस उभी राहील असा विश्वास लोंढे यांनी यावेळी व्यक्त केला. अर्ज सादर करताना काँग्रेसने अतुल लोंढे आणि दिनेश ढोले यांची नवे एकाच एव्ही फॉर्मवर दिल्याचं काँग्रेस खासदार शामकुमार बर्वे यांनी यावेळी सांगितलं.

---------------------------------------------------

बावनकुळे

महायुतीचे सर्व १७ उमेदवार विधान परिषद निवडणुकीत विजयी होतील आणि राज्यात महायुतीला मोठा राजकीय विजय मिळेल, असा विश्वास भाजप नेते चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केला. नागपुरात प्रसारमाध्यमांशी बोलताना त्यांनी भाजप ११, शिवसेना ४ आणि राष्ट्रवादी काँग्रेस २ जागांवर निवडणूक लढवत असल्याची माहिती दिली. अमरावतीतील नवनीत राणा आणि रवी राणा हे स्थानिक मतभेद असूनही महायुतीसोबतच राहतील, असं त्यांनी स्पष्ट केलं. नागपूर स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार डॉ. राजीव पोद्दार यांना विक्रमी मताधिक्य मिळेल, असा विश्वास बावनकुळे यांनी व्यक्त केला. 'लाडकी बहीण' योजनेतील अपात्र लाभार्थ्यांची समितीमार्फत पुनर्तपासणी केली जाणार असून पात्र महिलांना न्याय दिला जाईल, असंही ते म्हणाले.

---------------------------------------------------

विजय वडेट्टीवार

महाविकास आघाडीचे नेते विजय वडेट्टीवार यांनी महायुती सरकारवर लाडकी बहीण योजनेबाबत टीका केली आहे. निवडणुकीपूर्वी दिलेल्या आश्वासनांनंतर सत्तेत आल्यानंतर सरकारने लाखो महिलांना अपात्र ठरवून त्यांचा विश्वासघात केल्याचा आरोप त्यांनी केला. विधान परिषद निवडणुकीत भाजपकडून उद्योगपतींना उमेदवारी देण्याच्या निर्णयावरही त्यांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले. काँग्रेसमुक्त भारताचा नारा देणारी भाजप आता काँग्रेसयुक्त होत असल्याचा टोला लगावत अनेक नेते काँग्रेसमधून भाजपमध्ये गेल्याचं त्यांनी नमूद केलं. ओबीसी आरक्षणाच्या मुद्द्यावरही सरकारवर टीका करत घटनात्मक हक्कांच्या संरक्षणासाठी काँग्रेसचा पाठिंबा कायम राहील, असे वडेट्टीवार म्हणाले.

---------------------------------------------------

राज्यसभा द्वैवार्षिक

राज्यसभेच्या २४ जागांसाठी होणाऱ्या द्वैवार्षिक निवडणुकीसाठी आज अधिसूचना जारी करण्यात आली. या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरायला आजपासून सुरुवात झाली असून ८ जूनपर्यंत अर्ज भरता येतील. १८ जूनला मतदान होणार असून त्याच दिवशी मतमोजणी होईल. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी राज्यसभा सदस्यत्वाचा राजीनामा दिल्यामुळे रिक्त झालेल्या जागेसाठी, तसंच तमिळनाडू आणि ओदिशामधेही प्रत्येकी एका जागेसाठी पोटनिवडणूक होणार आहे. माजी पंतप्रधान एच.डी.देवेगौडा, केंद्रीय मंत्री जॉर्ज कुरियन आणि रवनीत सिंग, राज्यसभेतले विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे हे सदस्य या महिन्यात निवृत्त होत आहेत. आंध्रप्रदेश, गुजरात आणि कर्नाटकमधल्या प्रत्येकी ४, राजस्थान आणि मध्यप्रदेशातल्या प्रत्येकी ३, झारखंडमधल्या २, मणिपूर, मेघालय, अरूणाचल प्रदेश आणि मिझोराम इथल्या प्रत्येकी एका जागेसाठी ही निवडणूक होणार आहे.

---------------------------------------------------

ई-बसेस

राज्य परिवहन महामंडळाचा ताफा टप्प्याटप्प्याने पूर्णपणे ई-बसेसमध्ये रूपांतरित करण्याचे उद्दिष्ट असून, त्यासाठी आवश्यक चार्जिंग स्टेशनचे जाळे उभारण्याच्या कामाला गती देण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत. सन 2029 पर्यंत एसटीच्या 50 टक्के, 2035 पर्यंत 80 टक्के आणि 2047 पर्यंत 100 टक्के बसेस ई-बसेसमध्ये रूपांतरित करण्याचे लक्ष्य निश्चित करण्यात आले आहे. राज्याच्या ई-वाहन धोरणानुसार 1,500 ई-बसेसना बसच्या किमतीच्या 10 टक्के किंवा कमाल 20 लाख रुपयांपर्यंत अनुदान देण्याची तरतूद आहे. सध्या एसटी

महामंडळ जीसीसी मॉडेलवर 5 हजार 150 ई-बसेसचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प राबवत असून, त्यामुळे प्रवाशांना आधुनिक, आरामदायी आणि प्रदूषणमुक्त प्रवासाची सुविधा उपलब्ध होणार आहे.

---------------------------------------------------

सुमन कल्याणपूर

भावसंगीतात आपल्या मखमली आणि मधाळ स्वरांनी अधिराज्य गाजवणाऱ्या ज्येष्ठ पार्श्वगायिका सुमन कल्याणपूर यांचं काल रात्री मुंबईतल्या राहत्या घरी निधन झालं. त्या ८९ वर्षांच्या होत्या. त्यांच्या पार्थिवावर आज मुंबईत शासकीय इतमामात अंतिम संस्कार करण्यात आले. ऐकूया त्यांच्या कारकिर्दीचा थोडक्यात आढावा....

***(व्हॉइस कास्ट)***

***(सुमन कल्याणपूर यांचा जन्म 28 जानेवारी 1937 या दिवशी अविभाजित भारतातल्या ढाका इथं झाला. गायन आणि चित्रकलेची आवड असलेल्या सुमनताईंनी पंडित लक्ष्मण राव अमृते, पंडित  केशवराव भोळे , उस्ताद खान, अब्दुल रहमान खान आणि पंडित यशवंत देव यांच्याकडून शास्त्रीय संगीताचं शिक्षण घेतलं. सुमन हेमाडी या नावानं संगीत क्षेत्रात प्रवेश केलेल्या सुमनताई विवाहानंतर सुमन कल्याणपूर या नावानं प्रसिद्ध झाल्या. 1952 मध्ये ऑल इंडिया रेडिओवर गाण्याची संधी त्यांना मिळाली. 'केतकीच्या बनी' सारखं भावगीतं, गवळण, विरहगीतं, भावगीतं, भक्तीगीतं, बालगीतं अशा वैविध्यपूर्ण मराठी गाण्यांनी त्यांनी एक काळ गाजवला. आजकाल तेरे मेरे प्यार के चर्चे,  'न तुम हमें जानो', जिंदगी इंतेहान लेती  है, रहे ना रहे हंम' सारखी असंख्य गाणी गाऊन त्यांनी हिन्दी चित्रपट संगीतातही आपला वेगळा ठसा उमटवला. 'सुमन सुगंध' हे त्यांचं आत्मचरित्र प्रकाशित झालं आहे. संगीतातल्या त्यांच्या अमूल्य योगदानासाठी त्यांना, 'पद्मभूषण' पुरस्काराने गौरवण्यात आलं होतं, तर मध्य प्रदेश सरकारनं त्यांना 'लता मंगेशकर' पुरस्कारांनं सन्मानित केलं होतं....)***

महाराष्ट्राचे राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी ज्येष्ठ गायिका सुमन कल्याणपूर यांच्या निधनाबद्दल दुःख व्यक्त केलं आहे. त्यांच्या निधनाने संगीत जगतातील पवित्र देव्हारा रिकामा झाला आहे अशीच सर्वांची भावना असल्याचं राज्यपालांनी शोकसंदेशात म्हटलं आहे.भारतीय संगीत क्षेत्रातील दैवी आणि सुरेल 'सुमन' असा स्वर शांत झाला, अशा शब्दात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ज्येष्ठ पार्श्वगायिका सुमन कल्याणपूर यांना श्रद्धांजली अर्पण केली आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सुनेत्रा पवार यांनीही सुमन कल्याणपूर यांना श्रद्धांजली अर्पण केली आहे.

---

जेईई ॲडव्हान्स्ड निकाल

जेईई ॲडव्हान्स्ड 2026 चा निकाल आज जाहीर झाला असून दिल्ली झोनच्याशुभं कुमार याने 360 पैकी 330 गुण मिळवत देशात प्रथम क्रमांक पटकावला आहे. यंदा 1 लाख 79 हजार 694 विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली होती, त्यापैकी 56 हजार 880 विद्यार्थी यशस्वी ठरले आहेत. महिला उमेदवारांमध्ये आरोहि देशपांडे  अव्वल ठरली असून तिने अखिल भारतीय गुणवत्ता यादीत 77 वे स्थान मिळवले आहे.

---

हवामान

विदर्भाच्या बहुतांशी जिल्ह्यांमध्ये येत्या 4 जून पर्यंत वादळी पर्जन्यमान राहणार असून, आज गोंदिया आणि चंद्रपूर जिल्ह्यामध्ये विजांच्या कडकडाटासह सोसाट्याच्या वाऱ्याचा ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे.  तर नागपूर, वर्धा, अमरावती, यवतमाळ, गडचिरोली या जिल्ह्यांमध्ये वादळी पर्जन्यमानाचा येलो अलर्ट जारी करण्यात आलाय. हलका पाऊस आणि वादळी पर्जन्यमान यामुळे कमाल तापमानात किंचित घट झाली असून सर्वाधिक कमाल तापमान वाशिम इथं  43. 8 दशांश अंश सेल्सिअस इतकं नोंदवण्यात आलं तर नागपुरात 40 पूर्णांक २ दशांश अंश सेल्सिअस इतक्या कमाल तापमानाची नोंद करण्यात आली.

---